प्रेस नोट

शिरूर पोलीस स्टेशन गुरनं ६८७/२०१८ भादवि कलम ३७९,४४७,१२०ब,३४ या गुन्हयातील फिर्यादी श्री संजय बापुराव शितोळे वय ५४ वर्ष रा. घोडगंगा सहकारी साखर कारखाना वसाहत न्हावरा ता. शिरूर जि. पुणे यांनी फिर्याद दिली की, घोडगंगा सहकारी साखर कारखाना येथील स्कॅप यार्डातील लोंखडी टायर गाडीचे हाफ व लोखंडी चैन गिअर असे एकुण ४५ हजार रूपये किंमतीचा माल अज्ञात चोरटयांनी दि. २४/०९/२०१८ रोजी पहाटे ३.३० वाचे दरम्यान चोरी करून घेवुन गेलेबाबत दिले फिर्यादीवरून दि. २४/९/२०१८ रोजी वरील प्रमाणे शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री कैलास घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोसई शिंदे , पोहवा पाटमास ब.नं ७२०, पोना शेळके ब.नं १८८९, पोना गायकवाड ब.नं ५६७, पोना जाधव ब.नं १४९९ यांनी तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळी धाव घेवुन गुन्हयाचे ठिकाणची परीस्थीती पाहणी करून अज्ञात आरोपीचा शोध घेत असताना एक सश्ईत टेम्पो आलेगाव पागा रोड उभा असलेल्या टेम्पोची तपासणी केली असता सदर टेम्पोमध्ये गुन्हयातील चोरीस गेले माला पैकी काही मिळुण आला यावरून सदर गुन्हयाचे तपास दरम्यान सदरचा गुन्हा हा प्रभुदयाळ रामलाल शर्मा वय २३ वर्ष रा. कोंडापुरी ता. शिरूर जि. पुणे मुळ रा. नागलाशेख जि. अलीगड उत्तरप्रदेश, इरफान अली अन्वर अली खान वय २४ वर्ष रा. कोंडापुरी ता. शिरूर जि. पुणे मुळ रा. मठायारीया ता. कपीलवस्तु राज्य नेपाल, कमालउददीन रियबदुल्ला शेख रा. रा. कोंडापुरी ता. शिरूर जि. पुणे मुळ रा. बेल्लवु ता. बाशी जि. सिध्दार्थनगर उत्तरप्रदेश यांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले तसेच सदर आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेले माला व्यतिरीक्त एकुण९,१९,१७८ एवढया किंमतीचे कारखान्याचे इतर चोरीस गेलेले सपेअर पार्ट व स्कॅप जप्त करण्यात आले तसेच नमुद चोरीस माल वाहतुकीकरीता वापरलेले टेम्पो गुन्हयाचे कामी जप्त करण्यात आला आहे.